# टिके अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्जाचे आवाहन

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प रत्नागिरी १ मार्फत टिके ग्रामपंचायतीमधील टिके चाळकेवाडी अंगणवाडी केंद्रात अंगणवाडी मदतनीस रिक्त पद भरावयाचे आहे. तरी इच्छूक स्त्री स्थानिक उमेदवारांनी २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रत्नागिरी १, साईप्रसाद बंगला, एकता मार्ग, मारुती मंदिर येथे अर्ज करावेत, असे आवाहन एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प रत्नागिरी १ बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी केले आहे.

आवश्यक माहितीसाठी सुटटीचे दिवस वगळून इतर कार्यालयीन दिवशी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या



वेळेत संपर्क साधावा. नमुन्यातील परिपूर्ण अर्ज स्विकारले जातील. शैक्षणिक पात्रता इयत्ता बारावी उत्तीर्ण आवश्यक (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) गुणपत्रक आवश्यक असून पदवीधर, पदव्युत्तर, डी.एड, बी.एड. असल्यास गुणपत्रक आवश्यक आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस पदावर सरळ नियुक्तीसाठी वयोमर्यादा किमान १८ व कमाल ३५ वर्षे अशी राहील. तथापि विधवा उमेदवारांसाठी ही वयोमर्यादा कमाल ४० अशी राहील, असेही कळवले आहे.